# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

# जिल्हा पोलीस राजपत्र

## दि - 01.10.2018

## भाग 1 - बदली /नेमणूक /पदोन्नती

निरंक

## भाग 2 - रजा

निरंक

## भाग 3 - वेतन/भत्ते / रोखिकरण

निरंक

## भाग 4 - बक्षिस / मानधन

निरंक

# भाग 5-शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्रमांक :डीपी/३१-बी/आदेश तमील /स.रा.पो.नि.संतोष बाम्बडेकर / 12783 /२०१८ यवतमाळ, दि. 1 OCT 2018

**संदर्भ :-** क्रमांक.पोमस/११-अ/२२/०८/(वि चौ पिटीसी जालना)/२१२/२०१४
दि. १९/०९/२०१८..

**विषय :- आदेश तामील प्रत...**
स.रा.पो.नि.संतोष बाम्बेडकर, नेम. पोलीस मुख्यालय, यवतमाळ

०००

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये प्राप्त आदेशाची मुळ प्रत स.रा.पो.नि.संतोष बाम्बेडकर, नेम. पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवुन ती दुय्यम प्रत ईकडिल कार्यालयास सादर करावी.

सहपत्रः- आदेश प्रत.

**(मुकुंद कुळकर्णी)**
**प्र. पोलीस उपअधिक्षक,(मुख्या)**
**यवतमाळ.**

क्रमांक [illegible]-अ २२०८ (विचौ.-पोटीसी, जालना)/२१२/२०१४ मुंबई, दिनांक :- १९/०९/२०१८.

वाचा :- १) १) रासपोनि संतोष बाम्वडेकर, नेम. यवतमाळ, २) रासपोनि विनोद तांबे, नेम. पो.प्र.कें. तुरची. ३) रासपोनि सुरेश साबणे, नेम. जालना, ४) पोह/२६९ बालाजी शिवपुरे, नेम. लातूर. ५) पोह/५५८ विजय सांगळे, नेम. रारापोबल, गट क्र. ३, जालना, ६) पोह/८६४ शिवाजी साबळे, नेम. बुलढाणा, ७) पोह/१२४ गजानन नांगरे, नेम. जालना, ८) पोह/७०५ कमरुल साब हुद्दा, नेम. रारापोबल, गट क्र. १२, हिंगोली, ९) पोहवा/११८८७ दिपक जाधव, नेम. मुंबई शहर, १०) पोह/४९३ प्रविण तळेकर, रारापोबल, गट क्र. ३, जालना, ११) पोहवा/५७६ रमेश चव्हाण, नेम. औरंगाबाद शहर, १२) सपोउपनि सय्यद जहांगीर इमाम अली नेम. रारापोबल, गट क्र. १२, हिंगोली (तत्का. सर्व एक टप्पा पदोन्नतीने) प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांना प्रशिक्षण देण्यासाठी पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे नियुक्ती/प्रतिनियुक्तीवर आणि १३) पोशि/७७ सोनल पाटील, नेम. पुणे शहर यांच्या विरुध्दची विभागीय चौकशीची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची समक्रमांक दि.२७/०३/२०१८ ची कारणे दाखवा नोटीस.

३) उक्त अपचारी यांनी कारणे दाखवा नोटीसला सादर केलेले अभिवेदन.

Dt. ... SEP 2018
Branch DE
S.F.
Addl. S.P.
Dy.S.P.
O.S.
H.C.
I.N. No.
३६९९ २१-९-१८
२८/९/२०१८

* * * * *

**-: संक्षिप्त गोषवारा :-**

१) रासपोनि संतोष राममनोहर बाम्बडेकर, नेम. यवतमाळ, २) रासपोनि विनोद उत्तमराव तांबे, नेम. पोलीस प्रशिक्षण केंद्र तुरची, ३) रासपोनि सुरेश गंगाराम साबणे, नेम. पोलीस मुख्यालय, जालना, ४) पोह/२६९ बालाजी शिवपुरे, नेम. लातूर, ५) पोह/५५८ विजय नारायण सांगळे, नेम. रारापोबल, गट क्र. ३ जालना, ६) पोह/८६४ शिवाजी नारायण साबळे, नेम. पोलीस मुख्यालय, बुलढाणा, ७) पोह/१२४ गजानन प्रल्हाद नांगरे, नेम. पोलीस मुख्यालय, जालना, ८) पोह/७०५ कमरुल साब हुद्दा, नेम. रारापोबल गट क्र. १२ हिंगोली, ९) पोहवा/११८८७ दिपक जगदेव जाधव, नेम. मुंबई शहर, १०) पोह/४९३ प्रविण पुरुषोत्तम तळेकर, रारापोबल, गट क्र. ३, जालना, ११) पोहवा/५७६ रमेश गणपत चव्हाण, नेम. औरंगाबाद शहर, १२) सपोउपनि सय्यद जहांगीर इमाम अली नेम. रारापोबल गट क्र. १२ हिंगोली (तत्का. सर्व एक टप्पा पदोन्नतीने) प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांना प्रशिक्षण देण्यासाठी पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे नियुक्ती/प्रतिनियुक्तीवर आणि १३) पोशि/७७ सोनल पाटील, नेम. पुणे शहर यांनी पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे कार्यरत असताना खालील प्रमाणे कसुरी केलेली आहे.

**दोषारोप:-**

**१) राखीव सहायक पोलीस निरीक्षक संतोष राममनोहर बाम्बडेकर, यांचे दोषारोप पत्र :-** तुम्ही, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे बाह्यवर्ग प्रशिक्षणाचे राखीव सहायक पोलीस निरीक्षक-५ स्कॉडचे सेक्टर प्रभारी असताना तुमच्याकडे कवायत निदेशक आणि प्रशिक्षणार्थी यांचेवर सेक्टरचे बाह्यवर्ग प्रशिक्षण पर्यवेक्षणाची जबाबदारी होती. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत असताना अंत्यस्थ गैरहेतूने त्यांना शारीरिक व मानसिक त्रास देणे, मुळ घटकास परत करण्याची धमकी देणे इ. मानसिक व शारीरिक त्रास देत होता. वास्तविक पाहता आपणास प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर असेपर्यंत एक टप्पा पदोन्नतीने वेतन व भत्ते देण्यात येत होते.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांच्यावर होणाऱ्या मानसिक व शारीरिक त्रासाबद्दल मुलाखतीत सांगितले त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

**२) राखीव सहायक पोलीस निरीक्षक विनोद उत्तमराव तांबे यांचे दोषारोप पत्र :-** तुम्ही, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे बाह्यवर्ग प्रशिक्षणाचे राखीव सहायक पोलीस निरीक्षक-५ स्कॉडचे सेक्टर प्रभारी असताना तुमच्याकडे कवायत निदेशक आणि प्रशिक्षणार्थी यांचेवर सेक्टरचे बाह्यवर्ग प्रशिक्षण पर्यवेक्षणाची जबाबदारी होती. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत असताना अंत्यस्थ गैरहेतूने त्यांना शारीरिक व मानसिक त्रास देणे, मुळ घटकास परत करण्याची धमकी देणे इ. मानसिक व शारीरिक त्रास देत होता. वास्तविक पहता आपणास प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर असेपर्यंत एक टप्पा पदोन्नतीने वेतन व भत्ते देण्यात येत होते.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांच्यावर होणाऱ्या मानसिक व शारिरीक त्रासाबद्दल मुलाखतीत सांगितले त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

**३) सहायक पोलीस उप-निरीक्षक सुरेश गंगाराम सावणे यांचे दोषारोप पत्र :-** तुम्ही, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे प्रशिक्षण सुरू असताना मेस मॅनेजर म्हणून नेमणूकीस होता. सर्व प्रशिक्षणार्थींना त्यांच्या वेतनातून मेसवर झालेला खर्च वसूल करण्यात येतो. प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांना मैदानावर दररोज खुप मेहनतीचे काम करावे लागत होते. असे असतांना अंत्यस्थ गैरहेतूने त्यांना अतिशय निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जात होते. चपाती कडू लागणे व भाजीला चव नसणे, यामुळे एकही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई जेवणाबद्दल समाधानी नाही. वास्तविक पाहता आपणास प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर असे पर्यंत एक टप्पा पदोन्नतीने वेतन व भत्ते देण्यात येत होते. तसेच बऱ्याच वेळेस शेवटच्या प्रशिक्षणार्थी पोलीस शिपायास जेवण मिळत नव्हते.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांना प्रशिक्षण दरम्यान मिळत असलेल्या निकृष्ट व अपुऱ्या जेवणाबद्दल व त्यामुळे होणाऱ्या त्रासाबद्दल मुलाखतीत सांगितले, त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

**४) पोहवा/२६९ बालाजी शिवपूरे यांचे दोषारोपपत्र :-** तुम्ही, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे कवायत निदेशक व स्कॉड क्र. २७ वर प्रशिक्षक म्हणून होता. तुमच्याकडे ३३ प्रशिक्षणार्थी होते. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत असताना, अंत्यस्थ गैर हेतूने त्यांना मर्यादेपक्षा जास्त त्रास देणे इ. मानसिक व शारिरीक त्रास देत होता. वास्तविक पाहता आपणास प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर असेपर्यंत एक टप्पा पदोन्नतीने वेतन व भत्ते देण्यात येत होते.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांच्यावर होणाऱ्या मानसिक व शारिरीक त्रासाबद्दल मुलाखतीत सांगितले, त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

**५) पोहवा/५५८ व्ही. एन. सांगळे यांचे दोषारोपपत्र :-** तुम्ही, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे कवायत निदेशक होता. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत असताना, अंत्यस्थ गैर हेतूने त्यांना मर्यादेपक्षा जास्त कवायत करुन घेणे, गुडघ्यावर उभे करणे, असा मानसिक व शारिरीक त्रास देत होता. वास्तविक पाहता आपणास प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर असेपर्यंत एक टप्पा पदोन्नतीने वेतन व भत्ते देण्यात येत होते.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांच्यावर होणाऱ्या मानसिक व शारिरीक त्रासाबद्दल मुलाखतीत सांगितले, त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

६) पोहवा ८६४ एम. एन. सावळे यांचे दोषारोपपत्र :- तुम्ही, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे कवायत निदेशक म्हणून प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत असताना, अंत्यस्थ गैर हेतूने त्यांना मर्यादेपक्षा जास्त कवायत करुन घेणे, [illegible], असा मानसिक व शारिरीक त्रास देत होता. वास्तविक पाहता आपणास प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर असेपर्यंत एक टप्पा पदोन्नतीने वेतन व भत्ते देण्यात येत होते.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांच्यावर होणाऱ्या मानसिक व शारिरीक त्रासाबद्दल मुलाखतीत सांगितले, त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

७) पोहवा १२४ जी.पी. नागरे यांचे दोषारोपपत्र :- तुम्ही, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे प्रशिक्षण सुरू असताना मेस मॅनेजर म्हणून नेमणूकीस होता. सर्व प्रशिक्षणार्थींना त्यांच्या वेतनातून मेसवर झालेला खर्च वसूल करण्यात येतो. प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांना मैदानावर दररोज खुप मेहनतीचे काम करावे लागत होते, त्यांना उत्तम दर्जाचे जेवण अपेक्षित असताना अंत्यस्थ गैरहेतूने त्यांना अतिशय निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जात होते. चपाती कडू लागणे व भाजीला चव नसणे, यामुळे एकही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई जेवणाबद्दल समाधानी नाही. वास्तविक पाहता आपणास प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर असे पर्यंत एक टप्पा पदोन्नतीने वेतन व भत्ते देण्यात येत होते. तसेच बऱ्याच वेळेस शेवटच्या प्रशिक्षणार्थी पोलीस शिपायास जेवण मिळत नव्हते.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांना प्रशिक्षण दरम्यान मिळत असलेल्या निकृष्ठ व अपुऱ्या जेवणाबद्दल व त्यामुळे होणाऱ्या त्रासबद्दल मुलाखतीत सांगितले, त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

८) पोहवा ३०५ कमरुल साब हुद्दा यांचे दोषारोपपत्र :- तुम्ही, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे कवायत निदेशक म्हणून कार्यरत होता. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत असताना, अंत्यस्थ गैर हेतूने त्यांना फॉलीइनचा त्रास देणे, हजेरीबाबत त्रास देणे असा मानसिक व शारिरीक त्रास देत होता. वास्तविक पाहता आपणास प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर असेपर्यंत एक टप्पा पदोन्नतीने वेतन व भत्ते देण्यात येत होते.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांच्यावर होणाऱ्या मानसिक व शारिरीक त्रासाबद्दल मुलाखतीत सांगितले, त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

९) पोहवा/११८८७ डी. जे. जाधव यांचे दोषारोपपत्र :- तुम्ही, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे कवायत निदेशक म्हणून कार्यरत होता. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत असताना, अंत्यस्थ गैर हेतूने त्यांना मर्यादेपेक्षा जास्त त्रास देत होता. वास्तविक पाहता आपणास प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर असेपर्यंत एक टप्पा पदोन्नतीने वेतन व भत्ते देण्यात येत होते.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांच्यावर होणाऱ्या मानसिक व शारिरीक त्रासाबद्दल मुलाखतीत सांगितले, त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

१०) पोहवा/४९३ पी.पी. तळेकर यांचे दोषारोपपत्र :- तुम्ही, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे कवायत निदेशक म्हणून कार्यरत होता. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत असताना, मैदानावर अंत्यस्थ गैर हेतूने त्यांना मर्यादेपेक्षा

जास्त त्रास देत होता. वास्तविक पाहता आपणास प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर असेपर्यंत एक टप्पा पदोन्नतीने वेतन व भत्ते देण्यात येत होते.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांच्यावर होणाऱ्या मानसिक व शारिरीक त्रासाबद्दल मुलाखतीत सांगितले, त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

**११) पोहवा/५७६ रमेश गणपत चव्हाण यांचे दोषारोपपत्र :-** तुम्ही. पोलीस प्रशिक्षण केंद्र. जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे कवायत निदेशक म्हणून कार्यरत होता. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत असताना, अंत्यस्थ गैर हेतूने त्यांना मर्यादेपेक्षा जास्त त्रास देत होता. वास्तविक पाहता आपणास प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर असेपर्यंत एक टप्पा पदोन्नतीने वेतन व भत्ते देण्यात येत होते.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांच्यावर होणाऱ्या मानसिक व शारिरीक त्रासाबद्दल मुलाखतीत सांगितले, त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

**१२) सपोउपनि सय्यद जहांगीर इमाम अली यांचे दोषारोपपत्र :-** तुम्ही, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे कवायत निदेशक म्हणून कार्यरत होता. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत असताना, अंत्यस्थ गैर हेतूने त्यांना मर्यादेपेक्षा जास्त त्रास देत होता. वास्तविक पाहता आपणास प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर असेपर्यंत एक टप्पा पदोन्नतीने वेतन व भत्ते देण्यात येत होते.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांच्यावर होणाऱ्या मानसिक व शारिरीक त्रासाबद्दल मुलाखतीत सांगितले, त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

**१३) प्रपोशि/ चेस्ट नंबर ७७ सोनल पाटील यांचे दोषारोपपत्र :-** तुम्ही, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे प्रशिक्षण सत्र क्र. ८९ चे मुलभुत प्रशिक्षणाकरीता दाखल होता. त्यावेळेस इतर प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांस फॉलईनचा त्रास होण्याबाबत अत्यंत गैर हेतुने सांगत होता.

"जय महाराष्ट्र" या न्युज चॅनलने घेतलेल्या मुलाखतीत प्रशिक्षण सत्र क्र. ८९ मधील काही प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांनी अंत्यस्थ गैरहेतूने त्यांच्यावर होणाऱ्या मानसिक व शारिरीक त्रासाबद्दल मुलाखतीत सांगितले, त्याबाबतची न्युज प्रसारीत झाली आहे. त्यास आपण कारणीभुत आहात.

अशा प्रकारे तुम्ही तुमच्या कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचे स्पष्ट होत असल्याने तुम्ही "मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६" च्या नियम क्र.३ नुसार कोणत्याही शिक्षेस पात्र आहात.

२. या कार्यालयाच्या दि. २८/१२/२०१६ च्या आदेशान्वये उपरोक्त १३ नमुद कसुरदारांविरुध्द संयुक्तीक विभागीय चौकशी आदेशीत करुन चौकशी अधिकारी म्हणून प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, खंडाळा यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर विभागीय चौकशी नियमांनुसार पूर्ण करुन अंतीम निर्णयासाठी प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, खंडाळा तथा विभागीय चौकशी अधिकारी यांनी दि.२७/१२/२०१७ नुसार विभागीय चौकशीचा अहवाल या कार्यालयास (खंड १ ते ९ सह) पाठविला आहे. विभागीय चौकशीच्या कागदपत्रांची छाननी केली असता विभागीय चौकशी अधिकाऱ्यांनी अपचाऱ्यांना योग्य संधी व सवलती दिल्या असून विभागीय चौकशी ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीने पूर्ण केली आहे.

३. सदर विभागीय चौकशीतील अहवालाचे अवलोकन करता सह कसुरदार १) पोह/७०५ कमरुल साब हुद्दा, नेम. [illegible] गट क्र. १२ हिंगोली, २) पोहवा/११८८७ दिपक जगदेव जाधव, नेम. मुंबई शहर, ०३) पोहवा/५७६ रमेश गणपत चव्हाण, नेम. औरंगाबाद शहर, ०४) पोशि/७७ सोनल पाटील, नेम. पुणे शहर यांच्या प्रकरणी संयुक्त विभागीय चौकशीमध्ये यांच्याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात आला आहे.

४. विभागीय चौकशी अधिकारी यांनी समारोप अहवालात उक्त अपचारी यांच्यावर विभागीय चौकशीत ठेवण्यात आलेले उपरोक्त दोषारोप सिध्द होत असल्याने उर्वरित अपचारी यांना या कार्यालयाने क्र.पोमसं/११/-अ/२२/८/(विचौ.-पोप्रकें. जालना)/२१२/२०१४, दि.२७/०३/२०१८ अन्वये **"देय वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरीता स्थगीत करणे"** अशा प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस दिली होती. अपचारी यांनी सदर कारणे दाखवा नोटीसला सादर केलेले अभिवेदन विहीत मुदतीत या कार्यालयास सादर केले असल्याने ते विचारात घेतले आहे.

५. उक्त अपचारी यांनी कारणे दाखवा नोटीसला सादर केलेले अभिवेदन व त्यांच्याविरुध्दच्या विभागीय चौकशीच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, -

i) रासपोनि संतोष बाम्बडेकर यांचेविरुध्दचे विभागीय चौकशीमध्ये सरकारी साक्षीदार यांचे प्राथमिक चौकशीमध्ये जबाब नोंदविण्यात आले असून त्यामध्ये सरकारी साक्षीदार नप्रशि/३२७ इरफान सादिक शेख यांचे व्यतिरिक्त अपचारी यांचेविरुध्द कोणीही तक्रार केलेली नाही. तसेच विभागीय चौकशीचे वेळी सुध्दा अपचारी यांचेविरुध्द कोणतीही तक्रार सरकारी साक्षीदार यांनी केलेली नाही. सरकारी साक्षीदार इरफान सादिक शेख यांनी अपचारी बाम्बडेकर यांचेबाबत प्राथमिक चौकशीमध्ये दिलेल्या जबाबास अनुसरुन विभागीय चौकशीत उलट तपासणीत अपचारी यांचेबाबत पैशाचा जो उल्लेख केलेला आहे. तो ऐकीव माहितीवर असल्याचे सांगितले असून त्याबाबत काही पुरावा मिळून येत नाही. तसेच रासपोनि बाम्बडेकर यांची सेक्टर-८ मध्ये नेमणूक असून त्यांच्या अधिपत्याखालील कवायत निर्देशक हे प्रशिक्षणार्थी इरफान खान यांनी जबाबात नमुद केलेल्या अधिकाऱ्यांपैकी नाहीत. परंतु त्यांनी व्यवस्थित पर्यवेक्षण करुन प्रशिक्षणार्थी यांच्या अडीअडचणी वेळेत सोडविल्या असत्या तर सदर बातमी प्रसारीत झाली नसती. तथापि, त्यांचा पुर्वीचा सेवाभिलेख चांगला आहे.

ii) रासपोनि विनोद तांबे यांनी प्रशिक्षणार्थीविरुध्द रिपोर्ट न करण्यासाठी डी. आय. साबळे यांचेमार्फत प्रत्येकी रु.२००/- घेतल्याचे साक्षीदाराच्या जबाबावरुन दिसून येते .तथापि विभागीय चौकशीत साक्षीदार हजर राहीले नाहीत. तसेच इतर साक्षीदाराने समाधानकारक उत्तर न दिल्याने दोषारोपाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा समोर आलेला नाही. परंतु प्रशिक्षणार्थीची जय महाराष्ट्र या न्युज चॅनलने मुलाखत घेवून त्यामध्ये प्रशिक्षणार्थी यांना गैरहेतूने मानसिक व शारीरिक त्रास दिलेबाबत मुलाखतीत सांगितले आहेत. त्याबाबतची न्युज प्रसारीत झालेली आहे. त्यास अपचारी तांबे कारणीभुत आहेत कारण त्यांचेकडे पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे कवायत निर्देशक आणि प्रशिक्षणार्थी यांचेवर सेक्टर बाह्यवर्ग प्रशिक्षण पर्यवेक्षणाची जबाबदारी होती तसेच ते स्कॉडचे प्रभारी अधिकारी होते कवायत निर्देशक हे प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देताना प्रशिक्षणार्थीकडून कमी त्रासाच्या मोबदल्यात पैशाची मागणी करीत होते. गैरहेतूने मानसिक व शारीरिक त्रास देत होते हे पाहण्याची जबाबदारी व नियंत्रण पर्यवेक्षक अधिकारी म्हणून अपचारी तांबे यांची होती प्रशिक्षण केंद्रातील गैरप्रकाराबाबत व असंतोषाबाबत माहिती प्रशिक्षणार्थीकडून अपचारी यांनी वेळीच घेतली असती व त्यांच्या अडचणी वेळीच सोडविल्या असल्या तर प्रशिक्षणार्थी यांना न्युज चॅनलकडे तक्रार करण्यास वाव मिळाला नसता. त्यामुळे अपचारी तांबे यांनी त्यांचे कर्तव्याकडे दुर्लक्ष केल्याने न्युज चॅनेलला प्रशिक्षणार्थीची मुलाखत प्रसिध्द होण्यास कारणीभुत आहेत.

iii) सपोउपनि सुरेश साबणे हे मेस मॅनेजर म्हणून तीन महिने करीता कार्यरत असतांना प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांना अतिशय निकृष्ठ दर्जाचे जेवण दिले जात होते, अशी तक्रार केली होती. तथापि त्यांनी वेळेत प्रशिक्षणार्थी यांच्या भोजन व्यवस्थेबाबत तक्रारीचे निराकरण न केल्यामुळे सदर बातमी प्रसारीत होणेस कारणीभूत ठरले.

**iv) पोह/२६९ बालाजी शिवपूरे** यांनी प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण कालावधीमध्ये त्रास कमी होणेसाठी गैरहेतूने पैशाची मागणी केल्याचे विभागीय चौकशीत सिध्द झाले आहे. तसेच प्रशिक्षण केंद्रात होणाऱ्या त्रासाबाबत व गैरव्यवस्थेबाबत प्रशिक्षणार्थी यांच्या अडीअडचणी सोडविण्याची प्रथम जबाबदारी ही प्रशिक्षक म्हणून अपचारी यांची होती. प्रशिक्षणार्थी हे त्यांच्या अडीअडचणी प्रथम प्रशिक्षकांकडे सांगत असतात. तथापी अपचारी हेच गैरहेतुने प्रशिक्षणार्थी यांना मर्यादेपक्षा जास्त त्रास देत असल्याने प्रशिक्षणार्थी यांच्यात असंतोष निर्माण होवून त्यांनी प्रशिक्षण केंद्रातील गैरव्यवस्थेबाबत व गैरहेतुबाबत मुलाखत न्युज चॅनेलला दिली व सदरची न्युज प्रसारीत झाली हा दोषारोप सरकारी साक्षीदार यांनी प्राथमिक चौकशीमध्ये दिलेल्या जबाबावरुन व विभागीय चौकशीमध्ये केलेल्या उलट तपासणीतून दिसून येत आहे. त्यामुळे अपचारी गैरहेतुबाबत व न्युज चॅनेलला बातमी प्रसिध्द होणेस कारणीभुत हा अपचारी शिवपुरे यांचेवर ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द होत आहे.

v) पोह/५५८ विजय सांगळे यांनी प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण कालावधीमध्ये त्रास कमी होणेसाठी गैरहेतूने पैशाची मागणी केल्याचे विभागीय चौकशीत सिध्द झाले आहे. प्रशिक्षण केंद्रात होणाऱ्या त्रासाबाबत व गैरसोईबाबत प्रशिक्षणार्थी यांच्या अडीअडचणी सोडविण्याची प्रथम जबाबदारी ही प्रशिक्षक म्हणून अपचारी यांची होती. प्रशिक्षणार्थी हे त्यांच्या अडीअडचणी प्रथम प्रशिक्षकांकडे सांगत असतात. तथापी अपचारी हेच गैरहेतुने प्रशिक्षणार्थी यांना मर्यादेपक्षा जास्त त्रास देत असल्याने प्रशिक्षणार्थी यांच्यात असंतोष निर्माण होवून त्यांनी प्रशिक्षण केंद्रातील गैरव्यवस्थेबाबत व गैरहेतुबाबत मुलाखत न्युज चॅनेलला दिली व सदरची न्युज प्रसारीत झाली. त्यामुळे अपचारी सांगळे हे सदर बातमी प्रसारीत होणेस कारणीभूत ठरले आहेत.

vi) पोह/८६४ शिवाजी साबळे यांनी प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण कालावधीमध्ये त्रास कमी होणेसाठी गैरहेतूने पैशाची मागणी केल्याचे विभागीय चौकशीत सिध्द झाले आहे. प्रशिक्षण केंद्रात होणाऱ्या त्रासाबाबत व गैरसोईबाबत प्रशिक्षणार्थी यांच्या अडीअडीचणी सोडविण्याची प्रथम जबाबदारी ही प्रशिक्षक म्हणून अपचारी यांची होती. प्रशिक्षणार्थी हे त्यांच्या अडीअडचणी प्रथम प्रशिक्षकांकडे सांगत असतात. तथापी अपचारी हेच गैरहेतुने प्रशिक्षणार्थी यांना मर्यादेपक्षा जास्त त्रास देत असल्याने प्रशिक्षणार्थी यांच्यात असंतोष निर्माण होवून त्यांनी प्रशिक्षण केंद्रातील गैरव्यवस्थेबाबत व गैरहेतुबाबत मुलाखत न्युज चॅनेलला दिली. त्यामुळे अपचारी साबळे हे बातमी प्रसारीत होणेस कारणीभूत ठरले आहेत.

vii) पोह/१२४ गजानन नांगरे हे मेस मॅनेजर म्हणून कार्यरत असतांना प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांना अतिशय निकृष्ठ दर्जाचे जेवण दिले जात होते. या दोषारोपाबाबत कोणाही सरकारी साक्षीदार यांनी अपचारी यांचे गैरहेतुबाबत म्हणजेच अपचारी यांनी मेसमधील जेवणासाठी बेकायदेशीर गैरहेतूने पैसे मागणे अथवा त्यांचा कोणता गैरहेतू होता याबाबत प्राथमिक चौकशीत अथवा विभागीय चौकशीत केलेली नाही. फक्त जेवण व्यवस्थेबाबत तक्रार केलेली आहे. त्यामुळे अपचारी नांगरे यांनी प्रशिक्षणार्थी यांच्या भोजन व्यवस्थेबाबत तक्रारीचे निराकरण न केल्यामुळे सदर बातमी प्रसारीत होणेस कारणीभूत ठरले आहेत.

६. रासपोनि बाम्बडेकर, रासपोनि तांबे, सपोउपनि साबणे, पोह/५५८ सांगळे, पोह/८६४ साबळे व पोह/१२४ नांगरे यांचे अभिवेदन अंशत: समाधानकारक असल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेली **"देय वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरीता स्थगीत करणे"** ही शिक्षा त्यांच्या कसुरीच्या प्रमाणात जास्त असल्याचे माझे मत झाले आहे.

तसेच पोह/२६९ शिवपुरे यांचे अभिवेदन समाधानकारक नसल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेली "देय वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरीता स्थगीत करणे" ही शिक्षा त्यांच्या कसुरीच्या प्रमाणात योग्यच आहे. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश देत आहे :-

**-:आदेश :-**

मा. डॉ. प्रज्ञा सरवदे, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई या आदेशाद्वारे रासपोनि संतोष राममनोहर बाम्बडेकर, रासपोनि विनोद उत्तमराव तांबे, सपोउपनि सुरेश गंगाराम साबणे, पोह/५५८ विजय नारायण सांगळे, पोह/८६४ शिवाजी नारायण साबळे व पोह/१२४ गजानन प्रल्हाद नांगरे यांना कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेल्या **"देय वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरीता स्थगीत करणे"** या शिक्षेत अंशत: बदल करून रासपोनि संतोष राममनोहर बाम्बडेकर यांना **"सक्त ताकीद"**, रासपोनि विनोद उत्तमराव तांबे, पोह/५५८ विजय नारायण सांगळे, व पोह/८६४ शिवाजी नारायण साबळे यांना **"देय वार्षिक वेतनवाढ एक वर्षाकरीता स्थगीत करणे (अपरिणामकारक)"**, सपोउपनि सुरेश गंगाराम साबणे व पोह/१२४ गजानन प्रल्हाद नांगरे यांना **"रु.५००/- आर्थिक दंड"**, ही शिक्षा देत आहे.

तसेच पोह/२६९ बालाजी वृषीकेत शिवपुरे यांना कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेली **"देय वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरीता स्थगीत करणे (अपरिणामकारक)"** ही शिक्षा या आदेशाव्दारे **कायम** करीत आहे.

पोह/४९३ प्रविण पुरुषोत्तम तळेकर व सपोउपनि सय्यद जहांगीर इमाम अली यांना दिलेली कारणे दाखवा नोटीस या आदेशाव्दारे **रद्द** करीत आहे.

२. सदर शिक्षेने अपचारी हे व्यथित होत असल्यास सदरचे आदेश प्राप्त झालेल्या दिनांकापासून साठ (६०) दिवसाचे आत ते शासनाकडे योग्य मार्फतीने अपिल सादर करु शकतात.

स्वाक्षरी/-
**(डॉ. प्रज्ञा सरवदे)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

# भाग 6 - प्रशिक्षण व इतर

<u>बिनतारी संदेश</u>

प्रति - ठाणेदार यवतमाळ ग्रामिण/ पो.मु.यवतमाळ/ आर्णी / पोफाळी/ पारवा/ लाडखेड.

पासुन - पोलीस अधीक्षक, यवतमाळ

1 OCT 2018

हस्ते - राखिव पोलीस निरीक्षक, पो. मु./स्था.गु.शा./रोखपाल पो.मु./प्रवासभत्ता लिपिक/आकस्मिक लिपिक /डिपीजी.

क्रमांक-पोअय/आशा/प्रशि/डिटीएस कोर्स/ 12780 /२०१८ यवतमाळ दि.- ०१/१०/२०१८

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक येथे आयोजित प्रशिक्षणाकरीता खालील पोलीस कर्मचारी यांची निवड करण्यात आली आहे. सदर पोलीस कर्मचारी प्रशिक्षणाचे ठिकाणी सर्व तयारी निशी दिनांक ०३/१०/२०१८ रोजी २०.०० वा. चे पुर्वी न चुकता हजर राहतील. तसेच संबंधीत ठाणेदार यांनी पो. कर्म. प्रशिक्षणास रवाना झाल्याबाबत व प्रशिक्षण पुर्ण करुन आल्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. **सदर प्रशिक्षणास जाणेस टाळाटाळ केल्यास संबंधितांविरुध्द गंभीर दखल घेतली जाईल (.)**

| अ.क्र. | पो. कर्म. नाव | नेमणुक | प्रशि. शुल्क | प्रशि. कालावधी | प्रशिक्षण विषय |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोशि/ ५५२, विकास दत्ताजी गुरनुले | यवतमाळ ग्रामिण | रु. १७८९/- प्रत्येकी | ०४/१०/२०१८ ते ०९/१०/२०१८ | **सत्र क्र. १७०-** मालमत्तेच्या गुन्हयाचा तपास, शास्त्रोक्त विचारपुस चे महत्व. |
| २. | पोशि/ ५७३, गणेश पांडुरंग डुकरे | पो.मु.यवतमाळ | | | |
| ३. | पोशि/ ५८२, मंगेश हनुमंतराव ढबाले | आर्णी | | | |
| ४. | पोशि/ ६३०, सुनिल उल्हास जाधव | पोफाळी | रु. १७३३/- प्रत्येकी | ०४/१०/२०१८ ते ०९/१०/२०१८ | **सत्र क्र. १७१-** न्यायसहाय्यक विज्ञान व न्यायवैदयक शास्त्र चे महत्व. |
| ५. | पोशि/ ७९४, देवानंद बंडुजी जाधव | पारवा | | | |
| ६. | पोशि/ ५१२, उमेश विजयकुमार शर्मा | लाडखेड | | | |

२/- निवड करण्यात आलेले सदर कर्मचारी यांना प्राचार्य गुन्हे अन्वेशन प्रशिक्षण विद्यालय, नाशिक येथे दिनांक ०३/१०/२०१८ रोजी सायंकाळी २०.०० वाजता पावेतो हजर राहणेबाबत सुचना द्याव्यात.
(कार्यालय दुरध्वनी क्रमांक- ०२५३-२३५२१६४)

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( अनिलसिंह गौतम )
प्र. पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

क्रमांक :- पोअय/आली 80-सी/नवप्रविष्ठ/पो.कर्म-हजर/ 12706 /2018 यवतमाळ, दिनांक :- 27 SEP 2018

विषय :- नवप्रविष्ठ पोलीस कर्मचारी यांना बंन वाटप करणे बाबत

--- ००० ---

खालील नमुद नवप्रविष्ठ पोलीस कर्मचारी हे नमुद दिनांकास पोलीस मुख्यालय, यवतमाळ येथे हजर झाल्याने त्यांना या आस्थापनेवरिल रिक्त असलेले बंन त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे वाटप करण्यात येत आहे.

| अ.क्र | चेस्ट क्रमांक | देण्यात आलेला बंन | उमेदवारांचे नाव | कर्तव्यावर हजर झाल्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|
| 01 | 5973 | 48 | विवेकानंद काशिनाथ पवार | 14/09/2018 चे 19:45 वा. |
| 02 | 4949 | 94 | पंकज भाऊराव राठोड | 14/09/2018 चे 18:30 वा. |
| 03 | 1020 | 95 | चेतन शंकरराव राठोड | 14/09/2018 चे 19:45 वा. |
| 04 | 4504 | 144 | श्रीकांत विष्णुपंत कसर | 15/09/2018 चे 18:00 वा. |
| 05 | 4793 | 146 | ऋषिकेश नामदेव चव्हाण | 15/09/2018 चे 11:30 वा. |
| 06 | 362 | 164 | अजय शंकर ठाकरे | 14/09/2018 चे 18:30 वा. |
| 07 | 5881 | 165 | स्वप्निल अशोक रायवाडे | 15/09/2018 चे 11:00 वा. |
| 08 | 4777 | 166 | सचिन सुधाकर पिंपळकर | 15/09/2018 चे 08:30 वा. |
| 09 | 5247 | 171 | रामेश्वर आश्रुबा ढाकणे | 16/09/2018 चे 08:30 वा. |
| 10 | 4948 | 202 | सचिन रामदास बोंडे | 15/09/2018 चे 08:30 वा. |
| 11 | 2448 | 241 | सिध्दार्थ उत्तम कांवळे | 15/09/2018 चे 18:00 वा. |
| 12 | 3073 | 279 | पवन शंकर तडसे | 14/09/2018 चे 18:30 वा. |
| 13 | 1355 | 358 | श्रीकांत सुखदेव दुम्हारे | 15/09/2018 चे 18:00 वा. |
| 14 | 6475 | 366 | काजल गौतम तायडे | 14/09/2018 चे 18:30 वा. |
| 15 | 5831 | 374 | तुषार ज्ञानेश्वर अंवाडरे | 14/09/2018 चे 18:30 वा. |
| 16 | 6379 | 393 | स्वप्ना गंगाराम राऊत | 15/09/2018 चे 09:00 वा. |
| 17 | 6370 | 404 | चैताली राजेंद्र फुंडे | 15/09/2018 चे 11:00 वा. |
| 18 | 6476 | 407 | अश्विनी उत्तमराव मुरमुरे | 14/09/2018 चे 19:45 वा. |
| 19 | 7261 | 471 | शितल शंकर लडके | 15/09/2018 चे 09:00 वा. |
| 20 | 6056 | 483 | अमोल गौतम भालेराव | 15/09/2018 चे 18:00 वा. |
| 21 | 6463 | 496 | प्रिया मारोती मेश्राम | 15/09/2018 चे 11:00 वा. |
| 22 | 6420 | 561 | प्रांजली वसंतराव मडावी | 15/09/2018 चे 08:30 वा. |
| 23 | 6560 | 583 | विशाखा महादेव घोडाम | 15/09/2018 चे 09:00 वा. |
| 24 | 6129 | 603 | इंदु भाऊराव पवार | 17/09/2018 चे 12:00 वा. |
| 25 | 6332 | 621 | प्रेरणा बवन कांवळे | 14/09/2018 चे 19:45 वा. |
| 26 | 6221 | 720 | पुजा राजनरसय्या गोंन्लावार | 15/09/2018 चे 08:30 वा. |
| 27 | 6030 | 902 | प्रदिप लहुजी मानकर | 17/09/2018 चे 19:20 वा. |
| 28 | 6377 | 969 | अनुराधा अरुण नेहारे | 15/09/2018 चे 09:00 वा. |

(एम.राज कुमार)

पोलीस अधीक्षक, यवतमाळ

—— समाप्त ——